M. S. Board Of Secondary And Higher Secondary Education, Mumbai Divisional Board, Vashi, Navi Mumbai-400 703.		महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ, वाशी, नवी मुंबई–४०० ७०३.	

परिपत्रक क्र.मुविमं/लेखा/शिक्षण संक्रमण शुल्क २०२६/३६१७ दि. १२/०८/२०२६

विषय:– सन २०२६–२७ या शैक्षणिक वर्षाकरिता मंडळ मान्यता नोंदणी शुल्क लिंक उपलब्ध करून देण्याबाबत..

संदर्भ:– क्र.रा.मं./लेखा–११/३३६१ पुणे दिनांक १०/०८/२०२६ रोजीचे पत्र.

मुंबई विभागीय मंडळाच्या अधिनस्त सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत सन २०२६–२७ या शैक्षणिक वर्षाकरिता नोंदणी शुल्क (Registration fee) भरण्याची प्रक्रिया Online करण्यात आली आहे. सन २०२६–२७ या शैक्षणिक वर्षाकरिता नोंदणी शुल्क (Registration fee) राज्य मंडळाचे अधिकृत संकेतस्थळ www.mahahsscboard.in वर दिनांक २७/०७/२०२६ पासून प्रचलित पध्दतीने शुल्क भरणा करण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

१) संबंधित माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाकडून मार्च २०२६ परीक्षेसाठी प्रविष्ठ झालेल्या नियमित विद्यार्थी संख्येनुसार नोंदणी शुल्क निर्धारित करण्यात आलेले आहे.

२) दिनांक १५ ऑगस्ट २०२६ नंतर प्रचलित पध्दतीनुसार दंडात्मक शुल्कासह नोंदणी शुल्क Online पध्दतीने भरणा करावयाचे आहे.

फेब्र/मार्च २०२६ परीक्षेची नियमित विद्यार्थी संख्या गृहीत धरुन नोंदणी शुल्काचा तपशील खालील तक्त्याप्रमाणे आहे.

अ.क्र.	विद्यार्थी संख्या	१० वी नोंदणी शुल्क	१२ वी नोंदणी शुल्क
१	०१ ते १०० विद्यार्थ्यांपर्यंत	रु.१०००/–	रु.१०००/–
२	१०१ ते पुढील प्रत्येक १०० विद्यार्थ्यांसाठी	रु.२००/–	रु.४००/–

वरील प्रमाणे विहित मुदतीत इ.१० वी व इ.१२ वी नोंदणी शुल्क भरणा न केल्यास खालील प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

अ.क्र.	दिनांक	दंडाची रक्कम
१	१६ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०२६	रु.२००/–
२	०१ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२६	रु.३००/–
३	०१ ऑक्टोबर नंतर नियमित विद्यार्थ्यांची आवेदन पत्रे सादर करण्याच्या तारखेपर्यंत	रु.५००/–

३) सर्व मान्यताप्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालये यांना मंडळामार्फत दरमहा शिक्षण संक्रमण अंक छापील स्वरुपात देण्यात येत होता. या पुढे जुलै २०२६ पासून शिक्षण संक्रमण अंक Digital स्वरुपात विनाशुल्क मंडळाच्या अधिकृत संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत असून शिक्षण संक्रमण शुल्क रुपये ५००/– भरणा करण्यात येऊ नये.याची नोंद घेण्यात यावी.

(ज्योत्स्ना शिंदे–पवार)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई ४००७०३.

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
मुंबई विभागीय मंडळ कार्यालयाचे कार्यकक्षेतील
सर्व मान्यताप्राप्त शाळा व कनिष्ठ महाविद्यालय

प्रत माहितीस्तव–
मा.सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,भांबुर्डा,शिवाजीनगर पुणे